## प्राधिकरणाचे संकल्पित प्रकल्प
## विहित वेळेत पूर्ण व्हावेत

- राज्यमंत्री रवींद्र चव्हाण

मुंबई, दि. १६ ऑक्टोबर २०१८ – अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, तसेच माहिती-तंत्रज्ञान खात्याचे राज्यमंत्री श्री. रवींद्र चव्हाण यांनी प्राधिकरणातर्फे राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांचा आढावा घेतला आणि सर्व प्रकल्प विहीत वेळेत पूर्ण व्हावे यादृष्टीने कार्यवाही करावी असे आवाहन केले. प्रकल्पपूर्ततेच्या दृष्टीने काही अडचणी असल्यास किंवा मदत हवी असल्यास शासन त्यासाठी सर्वतोपरी मदत करेल असेही त्यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वांद्रे येथील कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

मेट्रो मार्ग-५ अर्थात ठाणे-भिवंडी-कल्याण, कल्याण रिंग रोड, नागरी विकास केंद्र, दुर्गाडी उड्डाणपुलाला जोडणारे संपर्कमार्ग इ. प्रकल्पांसह अन्य सर्व प्रकल्पांच्या प्रगतीची माहिती देणारे सादरीकरण यावेळी अतिरिक्त महानगर आयुक्त श्री.प्रविण दराडे यांनी केले. तर शिवडी-न्हावाशेवा आणि विरार-अलिबाग या बहुद्येशीय महामार्गाबाबतची माहिती अतिरिक्त महानगर आयुक्त श्री. संजय खंदारे यांनी दिली.

विविध प्रकल्पांच्या अनुषंगाने जनतेला दिलेल्या आश्वासनांची विहित वेळेत पूर्तता करण्यासाठी आम्ही बांधील आहोत, असे यावेळी श्री.चव्हाण यांनी सांगितले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त श्री. आर.ए.राजीव यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना प्रकल्प त्वरेने पूर्ण व्हावेत यासाठी आदेशित केले.

--------